.. Dasabodha Arati ..

# ॥ दासबोधाची आरती ॥

वेदांतसंमतीचा काव्यसिंधू भरला ।
श्रुतिशास्त्रग्रंथ साक्ष संगमू केला ॥
महानुभव संतजनी अनुभव चाखियला ।
अज्ञान जड जीवां मार्ग सुगम केला ॥ १॥

जय जयाजी दासबोधा ग्रंथराज प्रसिद्धा ।
आरती ओंवाळीन विमलज्ञान बाळबोधा ॥ धृ ॥

नवविधा भक्तिपंथें रामरूपानुभवी ।
चातुर्यनिधि मोठा मायाचक्र उघवी ॥
हरिहर हृदयींचे गुह्य प्रगट दावीं ।
बद्धची सिद्ध झाले असंख्यात मानवी ॥ जय ॥ २॥

वीसही दशकींचा अनुभव जो पाहे ।
नित्यनेमें विवरीतां स्वयें ब्रह्मची होये ॥
अपार पुण्य गांठी तरी श्रवण लाही ।
कल्याण लेखकाचे भावगर्भ हृदयीं ॥ जय ॥ ३॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 27, 1999